महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. – 020-25508700
जा.क्र. ८४११ दि.- ०८.०३.२०१९

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

**दिनांक – ०७/०३/२०१९** **दिनांक – दुपारी ०३.३० वा.**

**स्थळ** – महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

**श्री. अतिश अडागळे**
४२५/२६, गुलटेकडी औद्योगिक वसाहत,
पुणे ४११०३७.
} **अपिलार्थी**

**श्री. मु.म.शेख**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
} **जनमाहिती अधिकारी तथा** उप अभियंता

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री. अतिश अडागळे (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक २७/११/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक २७/११/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी सन २०१७-२०१८ निविदा कामांचे मेजरमेंट बुक बाबतची माहिती विचारलेली होती

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| **अर्जाचा दिनांक** | **अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** | **माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक** | **अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक** | **विलंब दिवस** |
| २७/११/२०१८ | २७/११/२०१८ | २७/१२/२०१८ | - | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती न दिल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक ०८/०२/२०१९ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| **अपिल अर्जाचा दिनांक** | **अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** | **अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक** |
| ०८/०२/२०१९ | ०८/०२/२०१९ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ – दि.०७/०३/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता – उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी – उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी – उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –**

| क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| मुद्दा क्र.१ | निविदा क्र.२८४-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |
| मुद्दा क्र.२ | निविदा क्र.२८५-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |
| मुद्दा क्र.३ | निविदा क्र.२८६-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |
| मुद्दा क्र.४ | निविदा क्र.२८७-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |
| मुद्दा क्र.५ | निविदा क्र.२८८-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |
| मुद्दा क्र.६ | निविदा क्र.२८९-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |

| | | |
|---|---|---|
| मुद्दा क्र.७ | निविदा क्र.२९०-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |
| मुद्दा क्र.८ | निविदा क्र.२९१-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |
| मुद्दा क्र.९ | निविदा क्र.२९२-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |
| मुद्दा क्र.१० | निविदा क्र.३१३-२०१७ च्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत मिळावी. | अर्जदारास माहिती देणेत आलेली नाही. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ०७/०३/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री. अतिश अडागळे हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री.अजय खामकर हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.अतिश अडागळे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अधिकार अर्जात नमूद माहितीच्या निविदा प्रकरणांची कार्यालयात पाहणी केली असता, सदरच्या प्रकरणांचा कार्यालयात आढळ होत नसल्याने माहिती देणेत आलेली नाही. परंतु प्रकरणांचा कार्यालयातील दप्तरात व अन्यत्र शोध घेणे सुरू असून प्रकरणे उपलब्घ झाल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असणारी माहिती उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे विवेचन केलेले आहे.

वरीलप्रमाणे संबंधित अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी, सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>**

- जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या निविदा प्रकरणांचा त्वरीत शोध घेवून अपिलार्थीने मागविलेली माहिती पुढिल २१ दिवसात अपिलार्थी श्री.अतिश अडागळे यांना विनामुल्य उपलब्ध करून देणेत यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची परिपूर्ण स्वरूपातील माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

८.३

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

<u>टिप -</u>

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे - ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत <u>www.punecorporation.org</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत -

१. श्री.अतिश अडागळे, ४२५/२६, गुलटेकडी औद्योगिक वसाहत, पुणे ४११०३७.
२. श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. श्री.अजय खामकर सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.